पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अॅण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३
सुविचार - आपल्या स्वप्नांची पाठपुरावा करणे हे जीवनाच्या सर्वात सुंदर प्रवासातील एक आहे. धाडसी बना आणि आपल्या स्वप्नांचा पीछा करा.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

| सेन्सेक्स | ७७,४०९.९८ | +२५४.३६ | +०.३३% |
|---|---|---|---|
| डॉलर | ₹ ९४.२३ | | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३९ | २५ |
| दिल्ली | ३९ | ३० |
| मुंबई | ३४ | २९ |
| नागपूर | ३९ | २७ |
| पुणे | ३६ | २३ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. १९ जून २०२६ | वर्ष २ रे | अंक २१८ | किंमत : ५ रु. | पाने ४

सूर्योदय - सूर्यास्त
स.-५:४७ संध्या-७:११

सोने – चांदी

| सोने (१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,४८,५००/- | २,४०,०००/- |

Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

## थोडक्यात



### दौंड–इंदापुरातील बनावट मद्य रॅकेटचा पर्दाफाश!

**मुंबई ।** राज्य उत्पादन शुल्क विभागाने दौंड व इंदापूर परिसरात मोठी कारवाई करत बनावट देशी व विदेशी मद्याची वाहतूक, साठवणूक आणि उत्पादन करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला. कारवाईत चार आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून एकूण ४ लाख ८१ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. बोरिबेल गावाच्या हद्दीत रेल्वे बोगद्याजवळ, दौंड–रावणगाव रस्त्यावर सापळा रचून मारुती सुझुकी अल्टो एलएक्स वाहनाची तपासणी करण्यात आली. यात दोघांना अटक करणण्यात आली आहे.

### पहिल्याच सामन्यात रोनाल्डोचा फ्लॉप शो!

**नवीदिल्ली ।** फिफा विश्वचषक २०२६ स्पर्धेला अत्यंत धडाकेबाज सुरुवात झाली असून, जगातील अव्वल फुटबॉलपटू आपल्या देशाला विश्वविजेते बनवण्यासाठी मैदानात सर्वस्व पणाला लावत आहेत. या स्पर्धेत एका बाजूला अर्जेंटिनाचा महान खेळाडू लिओनेल मेस्सीने अल्जेरिया विरुद्धच्या सामन्यात गोलची शानदार हॅट्रिक करत आपल्या संघाला दणदणीत विजय मिळवून दिला.

# संसदीय संकुल परियोजनेचा विस्तार वाढवणार

## ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांचा निर्णय

वृत्तसंस्था । मुंबई

**देशात सात राज्यांमध्ये ज्ञान भागीदार म्हणून योजक संस्थेच्या सहयोगाने संसदीय संकुल विकास परियोजना राबवण्यात येते. जनजातीय आणि दुर्गम भागांतील सर्वांगीण विकासामध्ये संसदीय संकुल उपक्रमाला महाराष्ट्रात चांगला प्रतिसाद मिळत आहे. या परियोजनेचा विस्तार विधानसभा क्षेत्रापर्यंत वाढविण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.**



वर्षा निवासस्थान येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली संसदीय संकुल विकास परियोजनेची महाराष्ट्रातील स्थिती संदर्भात आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीस माजी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. भारती पवार, खासदार डॉ. हेमंत सावरा, माजी खासदार हिना गावीत, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी,आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, ग्रामविकास विभाग सचिव डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, सेवावर्धिनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश देगावकर डॉ.गजानन डांगे, संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, ग्रामीण भागात शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करणे, स्थानिक कामाच्या अभावाने निर्माण होणारे स्थलांतर थांबवणे आणि शासनाच्या योजनांची समन्वय करून प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या परियोजनेचा विस्तार विधानसभा क्षेत्रामध्ये वाढवणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेसह शेती, सिंचन, रोजगार निर्मिती कौशल्य विकास आणि जीवनमान उंचावणाऱ्या विविध योजनांचा लाभ या भागांतील प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचविण्यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून विशेष प्रयत्न करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील १० ते २० गावांचा समावेश करून त्याचा समूह तयार करावा. महिलांचे सक्षमीकरण, दीर्घकालीन शाश्वत विकासासाठी वृक्षलागवड, जलसंधारण आणि नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन, युवकांसाठी बाजारपेठ व कौशल्य विकासाच्या संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या उपक्रमासाठी नोडल अधिकारी नेमण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# मतदानाच्या पूर्वसंध्येला अपक्ष अनिल चौधरींचा थांबण्याचा निर्णय

## कुणालाही पाठिंबा न देता घेतलेल्या निर्णयाने खळबळ

प्रतिनिधी । जळगाव



**विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले असतानाच, अपक्ष उमेदवार अनिल चौधरी यांनी मतदानाच्या पूर्वसंध्येला कोणालाही पाठिंबा न देता निवडणूक प्रक्रियेतून थांबण्याचा निर्णय जाहीर केला. त्यांनी अचानक घेतलेल्या या निर्णयामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, निवडणुकीचे समीकरणही बदलल्याची चर्चा सुरू झाली आहे.**

भुसावळचे माजी आमदार संतोष चौधरी यांचे बंधू असलेल्या अनिल चौधरी यांनी यंदाच्या विधान परिषद निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून जोरदार तयारी केली होती. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही प्रमुख गटांच्या उमेदवारांविरोधात त्यांनी आव्हान उभे केले होते. जिल्ह्यातील विविध नगरपालिका, नगरपंचायती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मतदारांशी संपर्क साधत त्यांनी स्वतःची स्वतंत्र ताकद उभी करण्याचा प्रयत्न केला होता. यापूर्वी २०१० मध्येही त्यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता. निवडणुकीच्या प्रक्रियेदरम्यान अनिल चौधरी यांना निवडणुकीतून माघार घेण्यासाठी (पान २ वर)

### रामदास कदमांनी 'ऑपरेशन टायगर'वरून उद्धव ठाकरेंना डिवचल

# ठाकरेंच्या शिवसेनेत फक्त तिघेच राहणार

वृत्तसंस्था । मुंबई

**'ऑपरेशन टायगर'वरून सध्या आरोप–प्रत्यारोपाने राजकारण चांगलंच तापलं आहे. याच पार्श्वभूमीवर बोलताना शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते रामदास कदम यांनी प्रतिक्रिया देत उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. तसेच ङ्गऑपरेशन टायगरफ्वरून रामदास कदम यांनी एकनाथ शिंदे यांचं कौतुक केलं आहे. तर ठाकरेंच्या शिवसेनेत फक्त तिघेजणच राहणार असल्याची टीका करत रामदास कदमांनी उद्धव ठाकरेंना डिवचलं आहे.**



संजय राऊत काय बोलत आहेत? ही भाषा त्यांना शोभते का? संजय राऊतांनी एका पत्रकार परिषदेत बोलताना शिवीगाळ केली. महाराष्ट्र त्यांना पाहतोय. पण शिवसेना ठाकरे गटावर ही वेळ का आली? उद्धव ठाकरे यांना सोडून आमदार, खासदार, मंत्री, पक्षाचे नेते, जिल्हा प्रमुख का सोडून जात आहेत? हे सगळं कोणामुळे होत आहे? उद्धव ठाकरेंना माझं सांगणं आहे, मराठी माणसांची शिवसेना संपत आहे, शिवसेना तुमच्या एकट्याची नव्हती, अशी टीका रामदास कदम यांनी केली आहे. मी उद्धव ठाकरे यांना हेच (पान २ वर)

## महापालिकेच्या शाळा खासगी संस्थांच्या ताब्यात

वृत्तसंस्था । पुणे



महापालिकेच्या पाच शाळांतील साडेचार हजार विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणार्या आकांक्षा फाउंडेशन या संस्थेला पुढील तीन वर्षे शिक्षक व अन्य स्टाफच्या वेतनासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे २५ हजार रुपये निधी देण्याच्या प्रस्तावास सत्ताधारी भाजपने बहुमताच्या जोरावर मान्यता दिली. या प्रस्तावास राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेसने विरोध केला. मात्र, मतदानाच्या जोरावर ४ विरोधात ११ मतांनी हा प्रस्ताव मंजूर केला आहे.

आकांक्षा फाउंडेशनने २००७ पासून टप्प्याटप्प्याने या शाळांची जबाबदारी स्वीकारली आहे. महापालिकेच्या के. सी. ठाकरे विद्या निकेतन (सोमवार पेठ), सावित्रीबाई फुले शाळा (भवानी पेठ), कै. अनंतराव पवार शाळा (बोपोडी), मातोश्री शाळा (येरवडा) आणि पूज्य कस्तुरबा गांधी शाळा (कोरेगाव पार्क) या पाच इंग्रजी (पान २ वर)

# अखेर अमेरिका–इराण यांच्यात करार; दोन्ही देशाकडून सामंजस्य करारावर स्वाक्षरी

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**अमेरिका आणि इराण यांच्यातील मागच्या अनेक महिन्यांपासून सुरू असलेला संघर्षाला अखेर निर्णायक यश मिळाले आहे. दोन्ही देशांमधील सुरू असलेले युद्ध पूर्णपणे थांबवण्याच्या उद्देशाने, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. अमेरिकेच्या एका अधिकाऱ्याने याला दुजोरा दिला.**



अमेरिकेच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, फ्रान्समधील व्हर्साय पॅलेसमध्ये मॅक्रॉन यांच्यासोबत डिनरच्या वेळी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी अमेरिका–इराण कराराच्या हार्ड कॉपीवर अधिकृतपणे स्वाक्षरी केली आहे. यावेळी त्यांनी, स्वाक्षरी केलेल्या कराराची प्रत इराण आणि मध्यस्थी करणाऱ्या देशांनाही पाठवण्यात आली आहे, अशीही माहिती दिली आहे.

अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हॅन्स आणि इराणचे मुख्य वार्ताकार मोहम्मद बाकेर गालिबाफ यांनी रविवारी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. अमेरिकन

### जिनिव्हा येथे भेटणार

**करारावर स्वाक्षरी झाली असूनही, अमेरिका–इराण अधिकारी शुक्रवारी जिनिव्हा येथे भेटणार आहेत. इराणी अधिकाऱ्यांनी सांगितले की, स्वित्झर्लंडमध्ये शुक्रवारच्या बैठकीचा उद्देश करारावर स्वाक्षरी करणे नाही. मात्र, ही बैठक प्रत्यक्षात होणार की नाही, याबाबतचा अंतिम निर्णय येत्या काही तासांत घेतला जाण्याची शक्यता आहे.**

कोणत्याही वाहतूक किंवा विमा निर्बंधांशिवाय तेल विकण्याची परवानगी दिली पाहिजे. त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर त्याला पूर्ण प्रवेश असावा. इराणच्या गोठवलेल्या मालमत्तेच्या प्रवेशातील अडथळे दूर करण्यासाठी अमेरिकेने आपली वचनबद्धता व्यक्त केली आहे, (पान २ वर)

# जळगाव विधान परिषद निवडणुकीसाठी ९७.७८ टक्के मतदान

## चाळीसगावच्या १३ नगरसेवकांचा निवडणुकीवर बहिष्कार!

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत एकीकडे विक्रमी ९७.७८ टक्के मतदानाची नोंद झाली असताना, दुसरीकडे चाळीसगाव येथील शहर विकास आघाडीच्या १३ नगरसेवकांनी जाहीर नाराजी व्यक्त करत थेट निवडणुकीवर बहिष्कार टाकल्याने राजकीय वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली.**



निवडणूक रिंगणातील अपक्ष उमेदवारांवर दबाव टाकून त्यांना माघार घेण्यास भाग पाडण्यात आल्याचा आरोप करत सर्व नगरसेवकांनी लोकशाहीची हत्या झाल्याची टीका केली.

विधान परिषद निवडणुकीसाठी सुरुवातीला चार उमेदवार रिंगणात होते. मात्र, दोन्ही अपक्ष उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यानंतर निवडणूक प्रामुख्याने महायुती आणि महाविकास आघाडीच्या दोन्ही उमेदवारांमध्ये झाली. यावर आक्षेप घेत भाजपचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या चाळीसगावात शहर विकास आघाडीचे अभिषेक देशमुख, सायली जाधव, घृष्णेश्वर पाटील, राजेंद्र चौधरी, दीपक पाटील, इमरान शेख, विजया पवार, राजश्री राजपूत, स्वाती राखुंडे, सविता ठाकूर, वैशाली मोरे, राहुल मस्के आणि पुनम अहिरे या नगरसेवकांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. अपक्ष उमेदवारांवर राजकीय (पान २ वर)

**अमळनेर, फैजपूर, जळगाव, एरंडोल आणि पाचोरा या पाच केंद्रांवर १०० टक्के मतदान झाल्याची नोंद झाली. भुसावळ केंद्रावर ९८.३१ टक्के मतदान झाले, तर चाळीसगाव येथे बहिष्काराच्या पार्श्वभूमीवर सर्वात कमी ७०.७३ टक्के मतदानाची नोंद झाली. निवडणुकीदरम्यान आणखी एका मुद्द्याने लक्ष वेधून घेतले. महाविकास आघाडीतील ठाकरे गटाचे उमेदवार शरद तायडे यांनी जळगाव येथील मतदान प्रक्रियेत कथित जादुई पेनचा वापर होत असल्याची तक्रार निवडणूक यंत्रणेकडे केली.**

## शेअर बाजार पुन्हा गोंधळात

वृत्तसंस्था । मुंबई

शेअर बाजारात आज बरीच गोंधळाची परिस्थिती दिसून आली. सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांमध्ये अस्थिर हालचाल दिसून आली. सुरुवातीच्या व्यवहारादरम्यान, ते कधी हिरव्या झोनमध्ये व्यवहार करत होते, तर कधी अचानक लाल झोनमध्ये घसरले. तथापि, बॉम्बे स्टॉक एक्सचेंजचा ३०–शेअर सेन्सेक्स ७७,००० च्या वर राहिला, तर नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी २४,००० च्या वर राहिला.



# भुसावळ-पुणेसाठी नवीन गाडी नाही; मग पुणे-दानापूरला हिरवा कंदील कसा?

## केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसेंच्या वक्तव्यावरून प्रवासी संतप्त

प्रतिनिधी । जळगाव

**पुणे–दानापूर अमृत भारत एक्सप्रेसच्या घोषणेनंतर उत्तर महाराष्ट्रातील रेल्वे प्रवाशांमध्ये नव्या चर्चेला तोंड फुटले आहे. रेल्वे प्रशासनाने नवीन अमृत भारत एक्सप्रेस सुरू करण्याची घोषणा केल्यानंतर नवीन गाडीचे वेळापत्रक आणि थांबेही निश्चित करण्यात आले आहेत. मात्र, या गाडीला जळगाव स्थानकावर थांबा देण्यात आलेला नसल्याने प्रवासी वर्गाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्याचवेळी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी दोन दिवसांपूर्वी केलेल्या नवीन रेल्वे गाड्यांच्या वक्तव्यावरुनही प्रवाशांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.**

### रक्षा खडसेंच्या त्या वक्तव्यावर प्रश्नचिन्ह



मात्र, पुणे ते दानापूर गाडीच्या घोषणेनंतर उत्तर महाराष्ट्रातील रेल्वे प्रवाशांनी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या दोन दिवसांपूर्वी केलेल्या वक्तव्यावर काही सवाल उपस्थित केले आहेत. भुसावळहून मुंबई किंवा पुण्यासाठी नवीन रेल्वे गाड्या सुरू करण्यास वाहतूक कोंडी आणि मार्गावरील क्षमतेची मर्यादा हे प्रमुख अडथळे असल्याचे मंत्री रक्षा खडसे यांनी स्पष्ट केले होते. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत भुसावळहून पुणे किंवा मुंबईसाठी नवीन गाड्या सुरू करणे किंवा लांबपल्ल्याच्या गाड्यांना थांबा देणे शक्य नसल्याचे त्यांनी म्हटले होते. अशा परिस्थितीत पुणे–दानापूर अमृत भारत एक्सप्रेसला मात्र मंजुरी कशी मिळाली, असा प्रश्न प्रवासी संघटनांनी उपस्थित केला आहे.

रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या माहितीनुसार, गाडी क्रमांक ११४३१ पुणे–दानापूर अमृत भारत एक्स्प्रेस दर शनिवारी दुपारी ३.३० वाजता पुणे स्थानकावरून सुटेल. आणि सोमवारी पहाटे १.३० वाजता दानापूर येथे पोहोचेल. तर गाडी क्रमांक ११४३२ दानापूरपुणे अमृत भारत एक्स्प्रेस दर सोमवारी पहाटे ३.३० वाजता दानापूरहून सुटून मंगळवारी सकाळी ११.०५ वाजता पुणे येथे दाखल होईल. या गाडीला दौंड कॉर्ड लाइन, अहिल्यानगर, बेलापूर, कोपरगाव, मनमाड, भुसावळ, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंगपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाल उपाध्याय, बक्सर आणि आरा या स्थानकांवर थांबे देण्यात (पान २ वर)

# टीम इंडियाची ऐतिहासिक कामगिरी

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

**आयसीसी वुमन्स टी–२० वर्ल्ड कप स्पर्धेत भारतीय महिला संघाने आपल्या दुसऱ्या सामन्यात नेदरलँडविरुद्ध मैदानात उतरत एक नवा इतिहास रचला आहे. या सामन्यात भारताने नाणेफेकीचा कौल गमावला आणि त्यांच्यावर प्रथम फलंदाजी करण्याची वेळ आली.**

मात्र, भारतीय फलंदाजांनी या आव्हानाचे संधीत रुपांतर करत अत्यंत आक्रमक सुरुवात केली. निर्धारित २० षटकांत भारताने ५ गड्यांच्या मोबदल्यात २०९ धावांचा डोंगर उभारला. या विशाल धावसंख्येचा पाठलाग करताना नेदरलँडचा संघ पूर्णपणे अपयशी ठरला आणि भारताने हा सामना ९५ धावांच्या मोठ्या फरकाने जिंकला. या दणदणीत विजयासोबतच भारतीय संघाने क्रिकेट जगतात अनेक मोठ्या विक्रमांची नोंद केली आहे. भारतीय महिला संघाने या सामन्यात २०९ धावा करत वुमन्स टी–२० वर्ल्ड (पान २ वर)

## संपादकीय

### पाण्याचा योग्य वापर होण्याची गरज

जून महिना निम्मा सरला, तरी वरुणराजाचे आगमन न झाल्यामुळे चिंताक्रांत झालेल्या अवघ्या महाराष्ट्राने देव पाण्यात घातले आहेत. मान्सून कोकणातून पुढे सरकत नसल्यामुळे पेरण्यांचा विषय अजून दूरच। आता राज्यापुढे पिण्याच्या पाण्याचीही चिंता निर्माण झाली आहे. राज्यातील प्रमुख धरणांमधील पाण्याचे साठे दिवसेंदिवस घटत असल्याने पाणी जपून वापरण्याचे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना करण्याची वेळ आली आहे. याआधी १५ जूननंतर पावसाची आशा होती. आता २२ ते २५ जूननंतरच मान्सूनसाठी अनुकूल स्थिती निर्माण होण्याचा सुधारित अंदाज आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्यावाचून गत्यंतर नाही. मात्र, या काळात नागरिकांच्या हिताचे निर्णय घ्यावेत. त्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनावर दबावा आणावा, याऐवजी नेते मंडळी निरनिराळ्या राजकीय ऑपरेशनमध्ये किंवा आपापले मतदारसंघ सोडून दिल्ली–मुंबईच्या वाऱ्या करण्यातच मश्गुल आहेत, हे आपले दुर्दैव. नैर्ऋत्य मान्सूनचा प्रवास अद्यापही कोकणातच रखडला असून, वायव्येकडून येणारे उष्ण वारे त्याच्या मार्गात अवरोध करीत आहेत. त्यामुळे जूनच्या सरासरीमध्ये तीस टक्के घट आली आहे. आता महिनाअखेरीस पावसाला सुरुवात होईल, अशी आशा असली, तरी एल निनो घटक सक्रिय झाल्याने महाराष्ट्रासह देशातील १२ राज्यांमध्ये मान्सून सरासरीपेक्षा कमी होण्याचा अंदाज आहे. अशा अनिश्चित काळात राज्यातील धरणांमध्ये २५ टक्के इतकाच उपयुक्त साठा आहे. गेल्या वर्षी राज्यात सरासरीच्या १०९ टक्के पाऊस झाला होता. त्यातही उत्तरार्धात अतिवृष्टी होऊन बंधारे फुटेस्तोवर पाऊस झाला. गेल्या वर्षी जूनमध्ये धरणांमध्ये ३१ टक्के साठा होता. त्यानंतर प्रचंड पाऊस होऊनही यंदा केवळ २५ टक्केच साठा कसा शिल्लक राहिला, याची झाडाझडती सरकार घेणार की नाही ? निवडणुकांच्या काळात आणि राजकीय पद्धतीने मागणी येईल, तसे पाणी सोडण्यामुळे आज धरणे तळाला गेली आणि हा पेचप्रसंग उभा राहिल्याच्या आरोपांचे नेमके उत्तर जलसंपदा खात्याने दिले पाहिजे. आता हे पाणी येत्या ३१ ऑगस्टपर्यंत पुरवून वापरण्याच्या सूचना सरकारने केल्या आहेत. परंतु, यंदाचा अनुभव लक्षात घेता तेवढ्यावर थांबून चालणार नाही. पाऊस खरेच कमी झाला, तर पुढच्या उन्हाळ्यात पाणीपुरवठ्याचे मोठे संकट येऊ शकते, हे लक्षात घेऊन काटेकोर नियोजन केले पाहिजे. धरणे रिकामी आणि विहिरी कोरड्या पडल्यामुळे खान्देश,मराठवाडा आणि विदर्भासह राज्याच्या विविध भागांत टँकरने पाणी पुरवण्याची वेळ आली आहे. टँकरमुक्त महाराष्ट्र अशा घोषणा नागरिक अनेक दशके ऐकत आहेत. त्यासाठी काही उपाययोजना झाल्या. सिंचन महामंडळे आली. जलजीवन मिशनसारख्या योजनांद्वारे पाणीपुरवठ्याच्या सोयी झाल्या. मात्र लोकसंख्येचा रेटा आणि पाण्याची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी अशा उपायांना गती देण्याची गरज आहे. त्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाच्या बैठकीत महाराष्ट्र ग्रामीण पेयजल धोरणाला दिलेली मान्यता महत्त्वाची आहे. यानुसार जलजीवन मिशन २.० मधील योजनांच्या दुरुस्तीला आणि पाण्याच्या पुनर्वापराला गती देण्यासारखे काही उपाय होतील. मात्र, या धोरणानुसार जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणी मिळणाऱ्या वापरकर्त्यांना दीडशे ते चारशे रुपयांची पाणीपट्टी भरावी लागणार आहे. यापुढील काळात किमान क्रयशक्ती असलेल्या वर्गाने तरी मोफत पाण्याची अपेक्षा धरणे योग्य होणार नाही आणि पाण्याच्या उधळपट्टीलाही चाप लावावा लागेल. घरगुती वापरापासून ते शेतीमध्ये पाण्याचा मोजूनच वापर करण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची मोठी गरज आहे. राज्यात विविध भागांत जलसंधारण योजना अपूर्ण असून अनेकांमध्ये पाणी साठत नाही. तसेच अनेक ठिकाणी वितरण व्यवस्था नाही, असे महालेखापालांच्या अहवालात आढळून आले आहे. अशा आव्हानाच्या काळात सरकारने कंबर कसणे आणि जनतेनेही पाण्याच्या योग्य वापरावर भर देण्याची गरज आहे.

# आरटीई कोट्यातून नियमबाह्य प्रवेश

## पाचोरा तालुक्यातील प्रकार; प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना दिले चौकशीचे निवेदन!

प्रतिनिधी । पाचोरा

**आरटीई २५% राखीव कोट्यामध्ये पिंपळगाव हरेश्वर परिसरातील नोकरदार आणि धनदांडगे असलेल्या पालकांच्या पाल्यांना शिक्षण विभागाने कोणतीही शहानिशा आणि आर्थिक निकष न लावता नियमबाह्य प्रवेश दिल्याबद्दल पिंपळगाव येथील विद्यार्थिनी तेजस्विनीचे पालक दिनेश राजेंद्र गायकवाड यांनी जळगाव प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना पुराव्यासह लेखी तक्रार पाचोरा गटविकास अधिकारी यांचे विभागात दिली आहे.**




या निवेदनात अत्यंत महत्त्वाच्या आणि गंभीर बाबीकडे लक्ष वेधत हा तातडीचा तक्रार अर्ज सादर केला असून आरटीई नियम पाहता शैक्षणिक दृष्ट्या आर्थिक मागास किंवा गरजू जवळच्या परिसरातील विद्यार्थ्यांना प्राधान्य मिळणे आवश्यक होते. मात्र, जाहीर झालेल्या आरटीई प्रवेश यादीत अनेक दूरवरच्या अंतरावर राहणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

सर्वात गंभीर बाब म्हणजे, ज्या विद्यार्थ्यांची, पालकांची निवड झाली आहे. त्यापैकी अनेक जण शासकीय व निमशासकीय सेवेत नोकरदार आहेत. ते नियमित इन्कम टॅक्स, आयटी रिटर्न भरतात आणि शासनाकडून हजारो रुपये मासिक वेतन उचलतात. काही पालकांची तर स्वतःची कोट्यवधी रुपयांची वैयक्तिक संपत्ती आहे. आरटीई कायदा हा आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकातील (गोरगरीब) मुलांसाठी आहे. असे असताना उत्पन्नाचे खोटे दाखले मिळवून किंवा चुकीची माहिती देऊन या श्रीमंत पालकांनी आरटीई यादीत प्रवेश मिळवला आहे. ही थेट शासनाची आणि खऱ्या गरजू गोरगरीब विद्यार्थ्यांची फसवणूक आहे. या शाळेतील आरटीई प्रवेशासाठी निवड झालेल्या सर्व संशयास्पद पालकांच्या उत्पन्नाच्या दाखल्यांची आणि नोकरीची तात्काळ सखोल चौकशी करण्यात यावी. चुकीची माहिती देऊन प्रवेश मिळवलेल्या पालकांचे प्रवेश तात्काळ रद्द करण्यात यावेत. दोषी आढळणाऱ्या पालकांवर आणि त्यांना सहकार्य करणाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत,अशी मागणी दिनेश गायकवाड यांनी केली आहे. ही संपूर्ण पडताळणी प्रक्रिया तक्रारदार म्हणून माझ्या समक्ष निकाली काढण्यात यावी. तसेच न्याय मिळावा, अशी अपेक्षा गरजू विद्यार्थ्यांच्या पालकांनी जळगाव प्राथमिक शिक्षणाधिकारी, पाचोरा पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असून या नियमबाह्य प्रवेशावर हे अधिकारी काय कार्यवाही करतात याकडे लक्ष लागले आहे.

# धुळ्यात श्री परशुराम युवा मंचतर्फे १५ बटूंचा व्रतबंध सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील श्री परशुराम युवा मंच आणि सखी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने ब्राह्मण समाजातील १५ बटूंचा सामुदायिक व्रतबंध (मुंज) सोहळा उत्साहात व धार्मिक वातावरणात पार पडला.**

या सामुदायिक व्रतबंध सोहळ्यात धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील १५ बटूंनी सहभाग घेतला. पुरोहितांच्या मंत्रोच्चारात आणि मार्गदर्शनाखाली सर्व धार्मिक विधी विधिवत पार पाडण्यात आले. सोहळ्यादरम्यान सामुदायिक व्रतबंध विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. हिंदू धर्मातील सोळा संस्कारांपैकी व्रतबंध संस्काराला विशेष महत्त्व आहे. आर्थिक अडचणींमुळे अनेक कुटुंबांना स्वतंत्रपणे हा विधी करणे कठीण जाते. ही बाब लक्षात घेऊन परशुराम युवा मंचतर्फे दर दोन वर्षांनी सामुदायिक व्रतबंध सोहळ्याचे आयोजन करण्यात येते,अशी माहिती मंचाचे अध्यक्ष भूषण जोशी यांनी दिली. या कार्यक्रमास नगरसेवक जयेश वावदे, नगरसेवक सनी चौधरी, तळईकर गुरुजी, मलकापूर गुरुजी, मांडवेकर, प्रसाद देशमुख, निलेश जोशी, किशोर राव, प्रदीप जोशी, अनिल दीक्षित, मयूर कुलकर्णी, रमेश कुलकर्णी, शेखर कुलकर्णी, गिरीश कुलकर्णी, निलेश भंडारी, महेश ठोसर, आनंद कुलकर्णी, भारती जोशी, रेखा कुलकर्णी, मीरा देव, सुषमा मोलीवाले, अश्विनी जोशी, उर्मिला चंद्रात्रे, वासंती दीक्षित, प्रणाली पंचभाई, स्वाती राव, वैशाली जोशी, जागृती पंचभाई, अश्विनी कुलेलकर, भावना शेंडे, हर्षदा कुलकर्णी, प्रतीक घोलप, पुष्कर जोशी, प्रथमेश जोशी आदी उपस्थित होते.




# दोंडाईचा येथे महाराणा प्रतापसिंह यांना अभिवादन



प्रतिनिधी । दोंडाईचा

**महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समितीतर्फे महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.**

महाराणा प्रतापसिंह यांच्या स्मारकाजवळ अभिवादन करण्यासाठी नागरिकांची गर्दी झाली होती. यात कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, भाजपा शहराध्यक्ष जितेंद्र गिरासे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण महाजन, माजी नगराध्यक्ष रविंद्र देशमुख, भाजपा जिल्हा सरचिटणीस डी. एस. गिरासे, न.पा. गटनेते निखिल जाधव, चंद्रकला सिसोदिया, बांधकाम देवरे, आरोग्य सभापती छोटू सोनवणे, पाणी पुरवठा सभापती चिरंजीवी चौधरी, नगरसेवक नरेंद्र गिरासे, नगरसेवक कृष्णा नगराळे, नगरसेवक रामभाऊ माणिक, नगरसेवक हितेंद्र महाले, भरत ठाकूर उपस्थित होते.

# इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान कॉलेज ऑफ फार्मसीत वृक्षारोपण

प्रतिनिधी । धुळे

**बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठान संचलित कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महाविद्यालय परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते.**



बोरकुंड येथील इंदुबाई भदाणे प्रतिष्ठानच्यावतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. यातच कॉलेज ऑफ फार्मसीत वृक्षारोपण करण्यात आले. मुक्तांगण शैक्षणिक संकुलच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून संस्थेच्या सचिव तथा माजी जि.प. सदस्या शालिनी भदाणे उपस्थित होत्या. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान संस्थेच्या सचिव शालिनी भदाणे यांनी वृक्षारोपणाचे महत्त्व अधोरेखित केले. नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण आणि हरित भविष्यासाठी वृक्षसंवर्धनाची गरज याविषयी मार्गदर्शन केले. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण झाली असून, वृक्षसंवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश अहिरराव, डॉ. दीपिका पंडित, प्रा. तृणाल सोनवणे, प्रा. यशवर्धन निंबाळकर, प्रा. आशिष शिंदे, प्रा. संस्कार बनछोड, प्रा. हितेश नावारकर, प्रा. केतन कथाळे, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरुन

### मतदानाच्या पूर्वसंध्येला अपक्ष......

विविध स्तरांवर प्रयत्न सुरू असल्याची चर्चा होती. विशेषतः भाजपचे ज्येष्ठ नेते तथा मंत्री गिरीश महाजन यांनी त्यांच्याशी अनेक वेळा संवाद साधल्याचे बोलले जात होते. चौधरी यांच्यासह ठाकरे गटाच्या उमेदवाराचाही पाठिंबा भाजपच्या उमेदवाराला मिळेल, असा दावा मंत्री महाजन यांच्याकडून करण्यात आला होता. मात्र चौधरी यांनी अखेरपर्यंत उमेदवारी कायम ठेवत जिल्हाभर प्रचार सुरू ठेवला होता. असे असताना बुधवारी सायंकाळी आयोजित पत्रकार परिषदेत अनिल चौधरी यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. कोणत्याही उमेदवाराला थेट पाठिंबा न देता आपण येथेच थांबत असल्याचे त्यांनी जाहीर केले. यावेळी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते बच्चू कडू यांच्याकडून आपल्याला संदेश प्राप्त झाल्याचा दावा केला. तसेच आगामी काळात आपण शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेला पाचोरा मतदारसंघाचे आमदार किशोर पाटील उपस्थित होते. चौधरी यांच्या निर्णयामुळे निवडणुकीतील तिरंगी लढतीचे चित्र बदलले आहे. अपक्ष उमेदवार मैदानाबाहेर गेल्याने आता भाजपचे उमेदवार नंदकिशोर महाजन आणि ठाकरे गटाचे उमेदवार शरद तायडे यांच्यात थेट सामना रंगणार आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारांमध्येही नव्या राजकीय चर्चांना उधाण आले असून चौधरी यांच्या निर्णयाचा अंतिम निकालावर कितपत परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ठाकरेंच्या शिवसेनेत......

सांगेल की तुम्ही पुन्हा एकदा आत्मपरीक्षण करा. तुमच्यावर ही वेळ का आली? तुम्हाला सोडून आमदार, खासदार, मंत्री, पक्षाचे नेते, जिल्हा प्रमुख का जात आहेत? तुम्ही बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र आहात, मग तुमच्या आजूबाजूला असं काय आहे की ज्यामुळे राजकारणात तुमची नाचक्की होत आहे.

### महापालिकेच्या शाळा......

माध्यम शाळा सध्या आकांक्षा फाउंडेशनमार्फत चालविल्या जातात. या शाळांमधील सर्वच बाबींचे ऑडिट करून महपालिकेच्या इतर शाळांतही याच पद्धतीने दर्जेदार शिक्षण देण्याबाबत अभ्यास करण्यासाठी महापौरांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण क्षेत्रातील समिती नेमण्यात येणार आहे, असेही भिमाले यांनी सांगितले. शाळांच्या या खासगीकरणाला काँग्रेस पक्षाकडून तीव्र विरोध केल्याचे समिती सदस्य प्रशांत जगताप यांनी सांगितले. स्थायी समितीचे पुनर्गठन झाल्यानंतर गेल्या ५ महिन्यांत पहिल्यांदाच एखाद्या प्रस्तावावर मतदान घेण्याची वेळ आली.

### अखेर अमेरिका–इराण......

असेही ते म्हणाले. या करारानंतर इराणचे म्हणणे आहे की, पुढील ६० दिवस दोन्ही देशांना संयम बाळगावा लागेल आणि कराराच्या अंमलबजावणीवर नकारात्मक परिणाम करणारे कोणतेही राजकीय, आर्थिक किंवा लष्करी पाऊल टाळावे लागेल.

### जळगाव विधान परिषद......

दबाव आणून त्यांना माघार घेण्यास भाग पाडण्यात आले. ही लोकशाहीची हत्या असून मतदारांचा पर्याय हिरावून घेण्याचा प्रकार आहे. तसेच निवडणुकीतील कोणत्याही उमेदवाराने आम्हाला विश्वासात घेतले नाही किंवा आमच्याशी संवाद साधण्याचाही प्रयत्न केला नाही. अशा परिस्थितीत निवडून आल्यानंतर त्यांच्याकडून विकासाची अपेक्षा कशी करायची, असा सवाल संबंधित नगरसेवकांनी उपस्थित केला. याच कारणास्तव आपण मतदानावर बहिष्कार टाकल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, गुरुवारी पार पडलेल्या मतदान प्रक्रियेत जिल्ह्यातील सात मतदान केंद्रांवर मोठा उत्साह दिसून आला. जिल्हा प्रशासनाने अमळनेर, फैजपूर, भुसावळ, जळगाव, एरंडोल, पाचोरा आणि चाळीसगाव येथे मतदान केंद्रांची व्यवस्था केली होती. जादुई पेनने नोंदविलेले मत दोन दिवसांनंतर मतपत्रिकेवरून अदृश्य होऊ शकते, असा आरोप शरद तायडे यांनी केला. मात्र, निवडणूक यंत्रणेने या आरोपांना कोणताही तथ्याधार नसल्याचे सांगत त्यांची तक्रार फेटाळून लावली. विक्रमी मतदान, नगरसेवकांचा बहिष्कार आणि मतदान प्रक्रियेबाबत करण्यात आलेले आरोप यामुळे यंदाची विधान परिषद स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाची निवडणूक विशेष चर्चेची ठरली.

### टीम इंडियाची ......

कप स्पर्धेच्या इतिहासात पहिल्यांदाच २०० धावांचा टप्पा ओलांडला आहे. विशेष म्हणजे, टी–२० वर्ल्ड कपमध्ये अशी अफाट कामगिरी करणारा भारत हा संपूर्ण आशिया खंडातील पहिलाच देश ठरला आहे.

### भुसावळ–पुणेसाठी नवीन......

आले आहेत. विशेष म्हणजे, भुसावळ विभागातील सर्वात महत्त्वाचे आणि मोठ्या प्रवासी संख्येचे जळगाव जंक्शन स्थानक या यादीत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. रेल्वे प्रशासनाच्या म्हणण्यानुसार, १८ एलएचबी अमृत भारत डब्यांसह ही गाडी धावणार असून महाराष्ट्रासह पूर्व उत्तर प्रदेश, झारखंड आणि बिहार यांच्यातील प्रवाशांना परवडणारी आणि थेट रेल्वे सेवा उपलब्ध होणार आहे.

# नगरदेवळा येथे महाराणा प्रताप जयंती साजरी

प्रतिनिधी । पाचोरा

**तालुक्यातील नगरदेवळा येथे महापराक्रमी वीर, उदयपूर मेवाडच्या शिसोदिया राजवंशाचे राजे, अजेय योद्धा, वीरशिरोमणी, हिंदुसूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या (तिथीनुसार) जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन व अभिवादन कार्यक्रम भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.**



या प्रसंगी माजी जि.प. सदस्य तथा शिवसेना जिल्हाप्रमुख रावसाहेब (जिभू) पाटील यांनी महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. मनोगतात त्यांनी महाराणा प्रतापसिंह यांचे शौर्य, स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा व मातृभूमीप्रती असलेली अतूट निष्ठा ही आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. संकटांना न डगमगता स्वाभिमानासाठी लढणारे महाराणा प्रताप हे भारतीय इतिहासातील तेजस्वी आदर्श असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, समाजबांधव तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्वांनी महाराणा प्रतापसिंह यांच्या विचारांचा आदर्श घेऊन समाजहित व राष्ट्रहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# रोटरी क्लब ऑफ नंदनगरीच्या अध्यक्षपदी सूर्यवंशी, सचिवपदी रघुवंशी

प्रतिनिधी । नंदुरबार

**येथील रोटरी क्लब ऑफ नंदनगरी नंदुरबारच्या अध्यक्षपदी नंदकिशोर सूर्यवंशी तर सचिवपदी महेश रघुवंशी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.**

रोटरी क्लब ही आंतरराष्ट्रीय स्वरूपाची सामाजिक संस्था असून आरोग्य, पर्यावरण, जलसंवर्धन, रक्तदान, पोलिओ निर्मूलन, शिक्षण, प्रौढ शिक्षण अशा विविध श्रेत्रात सदर संस्था जगभरात काम करते. याच जागतिक संस्था अंतर्गत रोटरी डिस्ट्रिक्ट या डिस्ट्रिक्ट मधील रोटरी क्लब ऑफ नंदनगरी, नंदुरबारचे हे नववे वर्ष असून या वर्षासाठी अध्यक्षपदी जिल्हा समाज कल्याण अधिकारी नंदकिशोर सूर्यवंशी तर सचिवपदी युवा उद्योजक महेश रघुवंशी यांची निवड करण्यात आली आहे. या वर्षी देखील विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. त्यात आरोग्य तपासणी शिबीर, डोळे तपासणी शिबीर, वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, व्हॉइस ऑफ नंदुरबार, बॉक्स क्रिकेट स्पर्धा, शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबीर यासह विविध उपक्रमांचा समावेश राहील.

# ढोल–ताशांच्या गजरात पी.आर. हायस्कूलमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील पी.आर. हायस्कूलमध्ये नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. ढोलताशांच्या गजरात, औक्षण करून तसेच गुलाबपुष्प देत नवागत विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. त्यामुळे शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये आनंद आणि उत्साहाचे वातावरण होते.**



शाळा सुरू होण्यापूर्वीच चिमुकल्या विद्यार्थ्यांची लगबग सुरू झाली होती. मुख्याध्यापकांसह शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांचे स्वागत केले. यानंतर विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ. अरुण कुलकर्णी होते. व्यासपीठावर मानद सचिव डॉ. मिलिंद डहाळे, संचालक अजय पगारिया, मुख्याध्यापक मेजर डी. एस.पाटील, पर्यवेक्षक ज्ञानेश्वर कोळी, आर.जे.धनगर उपस्थित होते. प्रास्ताविकात मुख्याध्यापक मेजर डी.एस.पाटील यांनी नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करत शाळेतील विविध शैक्षणिक व भौतिक सुविधांची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासह गुणवत्तावाढीसाठी शाळा कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली. मार्गदर्शन करताना डॉ.मिलिंद डहाळे म्हणाले की, विद्यार्थी शाळेच्या पहिल्या दिवशी केवळ शाळेत प्रवेश करत नाहीत, तर ज्ञानाच्या विशाल विश्वात पदार्पण करतात. शालेय जीवनातील प्रत्येक क्षण भविष्यातील यशाचा मजबूत पाया ठरतो,असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात डॉ.अरुण कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. शाळा म्हणजे केवळ अभ्यासाचे केंद्र नसून व्यक्तिमत्त्व विकासाची कार्यशाळा आहे. चुका झाल्या तर त्यातून शिकण्याची वृत्ती ठेवा, शिक्षकांचा व शाळेचा सन्मान राखा. शाळेतील पहिला दिवस आयुष्यभर स्मरणात राहणारा असतो,असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक रवींद्र पाटील यांनी केले, तर आभार ज्ञानेश्वर कोळी यांनी मानले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना गोड मिष्टान्नाचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.– ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी** (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१६७६ : छत्रपती शिवाजी राजांनी मराठा सरदार नेताजी पालकर यास शुध्द करुन हिंदू धर्मात घेतले.

१९६६ : हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रातील मर्द मराठ्यांची शिवसेना स्थापन केली.

१९०१ : भारतातील सुप्रसिध्द गणितज्ज्ञ व सांख्यिकीविज्ञ रामचंद्र बोस यांचा जन्म.

# पारंपरिक पौष्टिक फळ प्रजातींच्या उत्पादनाला प्रोत्साहन देण्याची गरज

## जैन हिल्स येथे फ्रूटफुल इंडिया प्रकल्पाची राष्ट्रीय संशोधन अनुदान नियोजन कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी डॉ.प्रेम माथुर यांचे प्रतिपदन

प्रतिनिधी । जळगाव

**भारताने अन्नसुरक्षेच्या क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली असली तरी पोषणसुरक्षा अजूनही मोठे आव्हान आहे. कुपोषणाचा परिणाम गरीब, आदिवासी आणि वंचित समाजघटकांवर होत असल्याने स्थानिक आणि पारंपरिक पौष्टिक फळ प्रजातींच्या उत्पादन व वापराला प्रोत्साहन देणे तसेच पर्यावरणाचे संरक्षण करणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉ. प्रेम माथुर यांनी केले.**




देशातील गरीब, आदिवासी आणि अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांना पौष्टिक फळे अधिक सुलभ व परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाकांक्षी राष्ट्रीय फ्रूटफुल इंडिया प्रकल्पाच्या तीन दिवसीय नियोजन कार्यशाळेचा शुभारंभ १६ जून रोजी जैन हिल्स येथील परिश्रम सभागृहात झाला होता. त्यात तज्ज्ञांनी विचारमंथन केले व काही महत्त्वाच्या गोष्टींचा उहापोह केला. या कार्यक्रमाचा समारोप १८ रोजी झाला. या कार्यशाळेचे उद्घाटन जैन इरिगेशनचे सह व्यवस्थापकीय संचालक अजित जैन यांच्या हस्ते झाले. यावेळी फलोत्पादन विभागाचे माजी उपमहासंचालक तथा सीएचएआयचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एच. पी.सिंह, अलायन्स ऑफ बायोडायव्हर्सिटी इंटरनॅशनल अँड सीआयएटीचे जागतिक कार्यक्रम प्रमुख डॉ. ख्रिस केटल, भारत प्रतिनिधी डॉ.जे.सी. राणा, तांत्रिक सल्लागार डॉ. प्रेम माथुर, डॉ. अनिल ढाके, डॉ.के.बी. पाटील, डॉ.बी.के आदी उपस्थित होते. या आंतरराष्ट्रीय कृषी संशोधन संस्थेचे मुख्यालय इटलीतील रोम येथे आहे. या कार्यशाळेत दहा राज्यांतील भागीदार संस्था, आयसीएआरच्या संशोधन संस्थांतील, राज्य कृषी विद्यापीठांतील आणि स्वयंसेवी संस्थांतील सुमारे ४० शास्त्रज्ञ, संशोधक तसेच आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ सहभागी झाले होते. अमेरिकास्थित समाजसेवी डॉ. उमेश माहेश्वरी यांच्या आर्थिक सहाय्याने हा प्रकल्प राबविला जात आहे. या प्रकल्पांतर्गत आवळा, जांभूळ, पेरू, सीताफळ, फालसा, बोर, करवंद, लिची, लिंबू आणि संत्री-मोसंबी यांसारख्या विविध पौष्टिक फळांच्या लागवडीला आणि वापराला प्रोत्साहन दिले जाणार आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर कमी पाण्यात येणारी, कमी खर्चाची आणि प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहणारी फळपिके ओळखून त्यांचा प्रसार करण्यावर भर दिला जाणार आहे. तसेच वर्षभर पौष्टिक फळांची उपलब्धता सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला जाईल. देशातील अल्पभूधारक आणि संसाधन-अभावी शेतकऱ्यांना अनेकदा अप्रमाणित स्रोतांकडून निकृष्ट दर्जाची रोपे खरेदी केल्यामुळे आर्थिक नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे रोग व कीडमुक्त, उच्च दर्जाची आणि लवकर फळधारणा करणारी लागवड सामग्री उपलब्ध करून देणे हा या प्रकल्पाचा एक महत्त्वाचा उद्देश आहे. पुढील पाच ते सहा वर्षांत हा प्रकल्प विविध राज्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी सहभागी शास्त्रज्ञ आणि तज्ज्ञांनी जैन इरिगेशनच्या संशोधन व उत्पादन सुविधांना भेट दिली. त्यांनी केळी, डाळिंब, आंबा आणि इतर फळपिकांसाठी वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक टिश्यू कल्चर तंत्रज्ञानाची, दर्जेदार रोप उत्पादन प्रणालीची तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची पाहणी केली. लाखो शेतकऱ्यांना दर्जेदार लागवड सामग्री पुरवून उत्पादनक्षमता आणि उत्पन्न वाढविण्यात जैन इरिगेशनने दिलेल्या योगदानाचे सहभागी तज्ज्ञांनी कौतुक केले. भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली येथील फलोत्पादन विभागाचे माजी उपमहासंचालक डॉ. एच.पी. सिंह यांनीही मनोगत व्यक्त केले. समारोपात डॉ. उमेश माहेश्वरी यांनी आभार मानले.

> जैन इरिगेशनच्या वतीने फ्रुट फुल इंडिया उपक्रमांतर्गत देशभरातील शेतकऱ्यांना आंबा, मोसंबी, संत्री, डाळिंब, स्ट्रॉबेरी, पेरू, नारळ, पपई यांसारख्या उच्च गुणवत्तेच्या फळांच्या रोपांचा तसेच ठिबक सिंचन तंत्रज्ञानाचा पुरवठा करणे शक्य आहे. सीएफआय व बायो डायव्हर्सिटी इंटरनॅशनल यांच्या सहकार्याने शेतकऱ्यांचे प्रशिक्षण जैन हिल्स येथे घेता येऊ शकते. गुणवत्तापूर्ण व अनुवंशिक शुद्धतेची रोपे मिळाल्याने ग्रामीण भागात फळ उत्पादन वाढेल, पोषण सुरक्षा निर्माण होईल व सुदृढ पिढी घडेल, असे प्रतिपादन सहव्यवस्थापकीय संचालक अजित जैन यांनी सांगितले.

## थोडक्यात

### गोदावरी इंजिनिअरिंग कॉलेजच्या दोघांची परिसर मुलाखतीतून निवड

**जळगाव ।** गोदावरी फाऊंडेशनच्या गोदावरी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निक, जळगाव येथील संगणक अभियांत्रिकी शाखेची विद्यार्थिनी मृणाली सपकाळे आणि गणेशराज पाटील यांची परिसर मुलाखतीतून निवड झाली आहे. मृणाली सपकाळे हीची आयटी क्षेत्रातील आघाडीची कंपनी कॉग्निझंटमध्ये तर गणेशराज पाटील यांची क्सेंचरमध्ये निवड झाली आहे. दोघांनी सातत्यपूर्ण मेहनतीच्या, तांत्रिक कौशल्यांच्या आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर ही यशस्वी कामगिरी केली आहे. या यशाबद्दल प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील, संगणक अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा. निलेश वाणी, प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी डॉ.विजयकुमार वानखेडे तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### सीए अंतिम परीक्षेत सार्थक बेहेडे यांचे उल्लेखनीय यश



**चिंचोली ।** येथील प्रगतिशील शेतकरी सुभाष शेठ बेहेडे यांचे नातू तथा नीरज सुभाष बेहेडे यांचे सुपुत्र सार्थक नीरज बेहेडे यांनी देशातील अत्यंत प्रतिष्ठित चार्टर्ड अकाउंटंट (सीए) अंतिम परीक्षा उत्तीर्ण करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सीए ही देशातील सर्वात कठीण आणि प्रतिष्ठेच्या व्यावसायिक परीक्षांपैकी एक मानली जाते. या परीक्षेत यश मिळविण्यासाठी कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्त आणि चिकाटीची आवश्यकता असते. सार्थक यांनी आपल्या जिद्द, मेहनत आणि समर्पणाच्या जोरावर हे यश प्राप्त केले.त्यांच्या या यशामुळे चिंचोली गावासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवारांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नीट परीक्षेसाठी १०० मीटर परिसरात प्रवेश बंदी

## २१ जून रोजी आयोजन; शासनातर्फे जय्यत तयारी

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील परीक्षा केंद्रावर नीट (यूजी) परीक्षा दि.२१ जून रोजी होणार असून परीक्षेदरम्यान कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत यासाठी प्रशासनाने उपाययोजना लागू केल्या आहेत. जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येणार आहे.त्यासाठी १०० मीटर परिसरात प्रवेश बंदी करण्यात आली आहे.**

जिल्ह्यात नीट (यूजी) परीक्षेसाठी एकूण १२ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. परीक्षा काळात केंद्रांवर गैरप्रकार होऊ नये तसेच शांतता व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन अपर जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार, २१ जून रोजी परिक्षा केंद्रावर पेपर सुरू झाल्यापासून ते पेपर संपेपर्यंतच्या कालावधीत सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात कोणालाही प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. मात्र, सदर आदेशान्वये परीक्षार्थी, नियुक्त अधिकारी-कर्मचारी, पोलीस व होमगार्ड यांना या निर्बंधातून सूट देण्यात आली आहे. तसेच, सर्व परीक्षा केंद्रांच्या ५०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स दुकानेही वरील कालावधीत बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आदेश तातडीच्या परिस्थितीमुळे एकतर्फी जारी करण्यात आला असून त्याचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# सकल माळी समाजातर्फे नवनिर्वाचित चेअरमन संगीता माळींचा सत्कार

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील नूतन विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमनपदी संगीता देवालाल माळी यांची बिनविरोध निवड झाल्याबद्दल सावता माळी समाज सुधारणा पंच मंडळाच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.**



याप्रसंगी मोठा माळी वाडा समाजाध्यक्ष व्ही.टी.माळी, लहान माळी वाडा समाजाध्यक्ष रामकृष्ण महाजन, उपाध्यक्ष शिवाजीराव देशमुख,सोमनाथ महाजन, सचिव आर.डी.महाजन, विश्वस्त ज्ञानेश्वर महाजन, कालिदास बाविस्कर, रामभाऊ माळी, कैलास वाघ, पुनमचंद बाविस्कर, देवालाल माळी यांच्यासह नगरसेवक निलेश चौधरी, परमेश्वर महाजन, लक्ष्मण माळी, हेमंत महाजन व कर्मचारी भिकनसिंग परिहार, छगन पाटील, ज्ञानेश्वर पुरभे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी व्ही. टी. माळी यांनी आपल्या मनोगतातून संगीता माळी यांच्या निवडीचे स्वागत करीत त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेची प्रगती अधिक वेगाने होईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच सभासदांच्या हिताचे निर्णय घेऊन संस्थेच्या विकासाला चालना देण्याचे आवाहनही करण्यात आले. सत्काराला उत्तर देताना संगीता माळी यांनी सर्वांचे आभार मानत, सभासदांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार असल्याची ग्वाही दिली.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू

प्रतिनिधी । यावल



**तालुक्यातील कोळन्हावी येथे अज्ञात वाहनाच्या धडकेत २४ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना कोळन्हावी-डांभुर्णी मार्गावरील पाटाच्या चारीजवळ घडली.**

पवन रवींद्र कोळी (वय २४, रा. कोळन्हावी) असे मृत युवकाचे नाव आहे. दि. १८ रोजी मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास पवन कोळी हे कोळन्हावी-डांभुर्णी रस्त्यावरील पाटाच्या चारीजवळ लघुशंकेसाठी थांबले होते. त्याचवेळी मागून भरधाव वेगाने आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने यावल ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. वैद्यकीय अधिकारी डॉ. तुषार सोनवणे यांनी मृतदेहाचे शवविच्छेदन केले. घटनेची माहिती मिळताच यावल पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. कोळन्हावी येथील उमेश दिलीप परदेशी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या अपघातामुळे कोळन्हावी परिसरात हळहळ व्यक्त होत असून, अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनाचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत. तपास सहाय्यक फौजदार वसंत बेलदार करीत आहेत.

# जि. प. शाळा क्र. १ भडगाव येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

## डिजिटल वर्गाचे उद्घाटन, विद्यार्थ्यांना अँड्रॉइड एलईडीची भेट

प्रतिनिधी । भडगाव

**नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे स्वागत आनंददायी आणि संस्मरणीय व्हावे या उद्देशाने जि. प. शाळा क्र.१, भडगाव येथे शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील डिजिटल वर्गाचे उद्घाटन करण्यात आले.**



शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांसाठी एक अनोखी भेट देत भडगाव नगरपरिषदेचे गटनेते लखीचंद पाटील यांनी शाळेला अँड्रॉइड एलईडी संच भेट दिला. या उपकरणामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल माध्यमातून शिक्षण घेणे अधिक सुलभ होणार असून अध्यापन प्रक्रियेत नाविन्यपूर्ण बदल घडून येणार आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांची आकलन क्षमता वाढविणे, दृकश्राव्य माध्यमांतून विषय अधिक प्रभावीपणे समजावून सांगणे आणि शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे शक्य होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी रावसाहेब पाटील यांनी शाळेने लोकसहभागातून उभारलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले. केंद्रप्रमुख राजेश साळुंखे यांनीही शाळेच्या प्रगतीसाठी शिक्षकांनी घेतलेल्या प्रयत्नांचे कौतुक करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याचे सांगितले. शाळेच्या मुख्याध्यापिका ज्योतिका पाटील, योगिनी पाटील, राजश्री देशमुख, शिरुडे सर तसेच छाया ढोले यांनी गटनेते लखीचंद पाटील यांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# अपूर्ण घरकुले पूर्ण करा; जि.प.सीईओंकडून पाहणी



प्रतिनिधी । जळगाव

**प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत जिल्ह्यात मंजूर झालेल्या घरकुलांपैकी अद्याप अपूर्ण असलेल्या घरकुलांचे बांधकाम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी जि.प.सीईओ करिश्मा नायर यांनी विशेष मोहीम हाती घेत स्वतः लाभार्थ्यांच्या भेटी घेऊन घरकुलांच्या कामांचा आढावा घेतला.**

पंतप्रधान आवास योजना टप्पा-१ अंतर्गत जिल्ह्यात एकूण ७६७५४ घरकुले मंजूर करण्यात आली असून त्यापैकी ५९४९ घरकुले अद्याप अपूर्ण अवस्थेत आहेत. या अपूर्ण घरकुलांची संख्या कमी करून सर्व पात्र लाभार्थ्यांना लवकरात लवकर स्वतःचे घर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा स्तरावर सातत्याने आढावा घेतला.जि.प.सीईओ करिश्मा नायर यांनी यावल तालुक्यातील डांभूर्णी तसेच धरणगाव तालुक्यातील नांदेड येथे भेट देऊन लाभार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. यावेळी त्यांनी लाभार्थ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. प्रलंबित बांधकामे पूर्ण करण्याबाबत सूचना दिल्या.

# आमडदे जिल्हा परिषद शाळेला अतिक्रमणाचा विळखा

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर; शाळेचा परिसर अतिक्रमणमुक्त करण्याची मागणी

प्रतिनिधी । भडगाव

**भडगाव तालुक्यातील आमडदे येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसराला अतिक्रमणाचा विळखा पडल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वातावरण, सुरक्षितता आणि शाळेचे अस्तित्वच धोक्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे. शाळेच्या जागेवर झालेल्या कथित अतिक्रमणामुळे शाळेची मूळ रचना आणि परिसर झाकोळला गेला असून, शाळा नेमकी कुठे आहे हेही बाहेरून ओळखणे कठीण झाले असल्याची तक्रार ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.**



गावातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शाळेच्या परिसरालगत करण्यात आलेल्या अतिक्रमणामध्ये काही माजी लोकप्रतिनिधी आणि प्रभावशाली व्यक्तींचा सहभाग असल्याची चर्चा गावात सुरू आहे. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करण्याबाबत प्रशासन उदासीन असल्याचा आरोपही ग्रामस्थांकडून होत आहे. शेतच कुंपण खाऊ लागले तर न्याय कुणाकडे मागायचा? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. ग्रामस्थांनी यापूर्वीही शाळेच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ काही व्यक्तींकडून मद्यपान करून गोंधळ घालण्याचे प्रकार होत असल्याची तक्रार केली होती. याशिवाय शाळेजवळ मटण व मासे विक्रीची दुकाने सुरू असल्याने विद्यार्थ्यांवर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याची चिंता पालकांकडून व्यक्त केली जात आहे. शाळा ही विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनाचे व संस्काराचे केंद्र मानली जाते. अशा ठिकाणी मद्यपान, गोंधळ आणि मटण-मासे विक्रीसारखे प्रकार सुरू असल्याने विद्यार्थ्यांसमोर चुकीचा आदर्श निर्माण होत असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे. शाळेजवळील अतिक्रमण आणि इतर गैरप्रकारांबाबत ग्रामपंचायत प्रशासनाला माहिती नसावी, असे होऊ शकत नाही, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. ग्रामपंचायत अधिकारी, प्रशासक आणि संबंधित यंत्रणांनी या प्रकरणात अद्याप ठोस कारवाई का केली नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. गावात तेरी चूप, मेरी भी चूप अशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा असून, परस्पर समन्वयातून अतिक्रमणाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा संशय नागरिक व्यक्त करीत आहेत. शाळेचा परिसर अतिक्रमणमुक्त करून विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि स्वच्छ शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. शाळेच्या परिसरातील अतिक्रमण हटविणे, मद्यपान करणाऱ्यांवर कारवाई करणे तसेच शाळेजवळील मटण व मासे विक्रीची दुकाने अन्यत्र स्थलांतरित करणे आवश्यक असल्याची मागणी जोर ध-रू लागली आहे.

> ### आंदोलनाचा इशारा
>
> शाळेच्या परिसरातील अतिक्रमण तातडीने हटवून संबंधित गैरप्रकारांवर कठोर कारवाई करण्यात आली नाही तर गावकरी लवकरच उपोषणाचा मार्ग स्वीकारतील, अशी चर्चा गावात सुरू आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन वस्तुस्थितीची चौकशी करावी व आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. विद्यार्थ्यांचे हित, शाळेचा सन्मान आणि कायद्याचे राज्य अबाधित ठेवण्यासाठी अतिक्रमण हटवून शाळेचा परिसर त्वरित मोकळा करावा, अशी एकमुखी मागणी आमडदे ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# महात्मा फुलेंच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त २०० वृक्षांचे रोपण

प्रतिनिधी । धरणगाव

**सध्याच्या काळात वाढदिवस साजरा करण्याच्या बदलत्या पद्धतींमध्ये केक कापणे, फटाक्यांची आतषबाजी, डिजीटल बॅनर्स आणि पाट्यांचा ट्रेंड वाढताना दिसत असताना, धरणगाव येथील निसर्गप्रेमी तथा समर्पण बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक महेंद्र तायडे यांनी आपल्या ४१ व्या वाढदिवसानिमित्त २०० वृक्षारोपण करीत समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकीचा आदर्श निर्माण केला आहे.**



राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले यांच्या २०० व्या द्विशताब्दी वर्षानिमित्त, तसेच मोरया नगरातील दिवंगत मित्र ॲड. विवेक पाटील, देवेंद्र पाटील, देविदास पाटील, दिनेश शिरसाठ, चेतन ठाकरे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ समर्पण बहुउद्देशीय संस्था व चिंतामणी मोरया नगर मित्र मंडळाच्या सहकार्याने धरणगाव व परिसरात २०० वृक्षांचे रोपण करण्यात आले. याचबरोबर संत, समाजसुधारक व महापुरुषांच्या विचारांचा प्रसार व्हावा या उद्देशाने २०० प्रेरणादायी ग्रंथांचे वाटप करून सामाजिक प्रबोधनाचा संदेशही देण्यात आला. पर्यावरणपूरक वृक्षांची लागवड करीत ग्रंथ भेट देण्याच्या अभिनव संकल्पनेमुळे पर्यावरण संवर्धन आणि वैचारिक समृद्धी या दोन्हींचा सुंदर संगम घडून आला. कोरोना महामारीच्या काळात ऑक्सिजनअभावी अनेकांना प्राण गमवावे लागल्याची वेदनादायी परिस्थिती समाजाने अनुभवली. त्यातूनच पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक अधोरेखित झाली. याच जाणिवेतून अधिकाधिक ऑक्सिजन देणाऱ्या वृक्षांची लागवड करून भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवागार वारसा निर्माण करण्याचा निर्धार महेंद्र तायडे यांनी व्यक्त केला. यशस्वीतेसाठी ललित मराठे, दीपक सूर्यवंशी, किशोर खैरनार, गणेश मराठे, चेतन सोनवणे, सागर ठाकरे, भूषण पाटील, आकाश साठे, आकाश बिवाल, मनोज गुजर, रमेश माळी, विजय सोनवणे, सुजल वाणी, अनंत धारणे, विजय महाजन, श्याम अहिरे, मयूर भामरे, संतोष सोनवणे, मुकेश लोहार, भरत शिरसाठ, गणेश गुरव, राजू कुंभार, राधे चौधरी, दीपक माळी, अमोल सूर्यवंशी, तेजस पाटील, नंदा महाजन, बाळासाहेब जाधव, साई पवार, बंटी महाजन, दिव्येश मराठे, बापू मोरे, समाधान मराठे, धीरू अहिरे, राज पवार, यश पाटील, लक्ष्मीकांत पित्रोडा, सोहम पाटील यांनी परिश्रम घेतले.

# पाळधीत राज्यस्तरीय बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा उत्साहात

## पुणे जिल्हा सांघिक विजेता; सातारा जिल्हा संघ ठरला उपविजेता; ५१७ खेळाडूंनी नोंदविला सहभाग

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनतर्फे, बॉक्सिंग फेडरेशन ऑफ इंडियाच्या संलग्नतेने आयोजित करण्यात आलेली ११ वर्षांखालील, १३ वर्षांखालील व १५ वर्षांखालील मुले व मुलींची राज्यस्तरीय बॉक्सिंग अजिंक्यपद स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात संपन्न झाली.**

बॉक्सिंग असोसिएशन ऑफ जळगावतर्फे दि. ११ ते १५ जूनदरम्यान पाळधी (ता. धरणगाव) येथील सुगोकी लॉन्स अँड रिसॉर्ट येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून तब्बल ५१७ खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला. त्यामुळे स्पर्धेला राज्यस्तरावर मोठा प्रतिसाद मिळाला. पाच दिवस चाललेल्या या स्पर्धेत अनेक रोमांचक आणि चुरशीचे सामने रंगले. खेळाडूंनी आपल्या कौशल्य, वेग, ताकद आणि तांत्रिक क्षमतेचे उत्कृष्ट प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धेचे उद्घाटन स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष रंजीत सावरकर यांच्या हस्ते झाले. स्पर्धेतील सांघिक गटात पुणे जिल्ह्याने उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले, तर सातारा जिल्ह्याने उपविजेतेपद मिळविले.



विविध वजनी गटांतील विजेत्या खेळाडूंनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात स्थान निश्चित केले आहे.

हे खेळाडू दि. २३ ते ३० जूनदरम्यान पंजाब येथे होणाऱ्या राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी खासदार स्मिता वाघ यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना पारितोषिके प्रदान करण्यात आली. यावेळी त्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी बॉक्सिंग असोसिएशन ऑफ जळगावच्या पदाधिकाऱ्यांनी व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

### यांची होती उपस्थिती

यावेळी महाराष्ट्र बॉक्सिंग असोसिएशनचे महासचिव डॉ. राकेश तिवारी, कोषाध्यक्ष मिलन वैद्य, अनिल त्रिवेदी, उद्योजक गोपाल कासट, बॉक्सिंग असोसिएशन ऑफ जळगावचे जिल्हाध्यक्ष निलेश बाविस्कर, जिल्हा उपाध्यक्ष धनराज कासट, जिल्हा उपाध्यक्ष नरेंद्र मोरे, जिल्हा सचिव चुणीलाल गुप्ता, सुनील नावगिरे आदी मान्यवर उपस्थित होते. तर स्पर्धेसाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील, सुगोकी गृपचे गोपाल कासट आदींचे सहकार्य लाभले आहे.

## थोडक्यात

### जि.प.प्राथमिक शाळा मोंढाळे येथे प्रवेशोत्सव

**पाचोरा । तालुक्यातील** मोंढाळे जि.प.प्राथमिक शाळा येथे १५ जून शाळा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा झाला.यावेळी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश वाटप करण्यात आले. प्रभाकर आखाडे व मीराबाई आखाडे यांचे सुपुत्र प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र आखाडे यांनी विद्यार्थ्यांना ६३ हजार रुपयांच्या वह्या देणगी स्वरूपात दिल्या. कार्यक्रमास सर्वश्री प्रभाकर आखाडे, नवीन पाटील, एकनाथ सोनवणे, किशोर गुंजाळ, वाल्मीक पाटील, भाऊसाहेब आखाडे, राहुल जाधव, मिराबाई आखाडे, अश्विनी पाटील, मोनाली पाटील, ललितातार्ई पाटील, शोभाताई पाटील, अकिला तडवी यांसह अनेक माता, पालक उपस्थित होते.

### प्रगती विद्यालय येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात

**भुसावळ ।** रोझोदा येथील प्रगती विद्यालयात प्रवेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला लोकशिक्षण मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे औक्षण करण्यात आले. त्यानंतर श्री कामसिद्ध व श्रीराम मंदिर संस्थांनाच्या वतीने इयत्ता पाचवीतील नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना दप्तर, शालेय गणवेश, वह्या, पुस्तके तसेच इतर शैक्षणिक साहित्य भेट म्हणून देण्यात आले. अध्यक्ष विजय महाजन, लोकशिक्षण मंडळाचे अध्यक्ष ललित धांडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक व्ही. पी. सुरवाडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले. प्रसंगी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## धुळे-रोटवद बसला अचानक आग अग्निशमन दलाच्या तत्परतेने अनर्थ टळला

प्रतिनिधी । अमळनेर

**धुळे-रोटवद मार्गावरील बसला काल दि. १८ रोजी सकाळी सुमारे ८ वाजेच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. धुळे आगाराची बस (क्र. चक४० ९८२१) राजभवनसमोर उभी असताना लायनर चिपकल्यामुळे आग लागल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे.**



या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी वेळीच उपाययोजना करत आग आटोक्यात आणल्याने मोठा अनर्थ टळला. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती मिळाली आहे. आग विझविण्याच्या कार्यात कर्मचारी फारुख शेख, मच्छिंद्र चौधरी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्परतेने प्रयत्न करून परिस्थिती नियंत्रणात आणली. त्यांच्या सतर्कतेमुळे आग अधिक पसरण्यापूर्वीच विझविण्यात यश आले. या घटनेमुळे काहीकाळ परिसरात नागरिकांची गर्दी झाली होती. मात्र आग आटोक्यात आल्याने परिस्थिती पूर्ववत झाली.

## चोपडा येथील मागासवर्गीय वसतिगृहात विद्यार्थ्यांना मोफत प्रवेशाबाबत आवाहन

प्रतिनिधी । चोपडा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय संस्था संचलित कमला नेहरू मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह जि. प. समाज कल्याण अनुदानित शासनमान्य सर्वसोयी सुविधायुक्त वसतिगृह असून येथे इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थिनींना मोफत प्रवेश देणे सुरू आहे. विद्यार्थिना शैक्षणिक भवितव्य घडविण्यासाठी पोटतिडकीने कार्य करणारा कर्मचारी वर्ग येथे आहे.

वसतिगृहात आदिवासी, मागासवर्गीय एससी, एसटी, एनटी, अपंग विमुक्त मागास प्रवर्ग विद्यार्थिनींना मोफत प्रवेश दिला जात असून अंथरून पांघरून कपाटे, ताट, राहणे व जेवणाची मोफत सोय व इतर सुविधा पुरविण्यात येतात. तरी मोफत प्रवेशाचा लाभ गरजू विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष महेश शिरसाठ व वसतिगृह अधीक्षिका कावेरी महेश कोळी यांनी केले आहे.

## नायगाव विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव समारंभ

प्रतिनिधी । यावल

तालुक्यातील नायगाव येथील सातपुडा माध्यमिक विद्यालयात प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. प्रवेशोत्सव या कार्यक्रमाला संभाजी पाटील, लीलाधर पाटील, राजेंद्र पाटील, मुख्याध्यापक एस.के. देवरे, ज्येष्ठ शिक्षक व्ही. बी. सूर्यवंशी, उपस्थित होते.

## महाराणा प्रताप जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर उत्साहात

### सूर्यवंशी कुशवाह राजपूत बहुउद्देशीय संस्थेतर्फे जयंती उत्साहात साजरी

प्रतिनिधी । जळगाव

**शौर्य, पराक्रम, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक असलेल्या हिंदू सूर्य वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची जयंती सूर्यवंशी कुशवाह राजपूत बहुउद्देशीय संस्था, जळगाव यांच्या वतीने उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिराने कार्यक्रमाला सामाजिक बांधिलकीची जोड मिळाली.**



कार्यक्रमाची सुरुवात महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलनाने करण्यात आली होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महाराणा प्रताप यांच्या जीवनकार्याचा गौरवपूर्ण आढावा घेत त्यांच्या शौर्य, त्याग, संघर्ष आणि स्वाभिमानी वृत्तीचा आदर्श समाजाने अंगीकारण्याची आवश्यकता व्यक्त केली. राष्ट्रहित आणि स्वाभिमानासाठी आयुष्यभर संघर्ष करणाऱ्या महाराणा प्रताप यांच्या विचारांची आजही समाजाला प्रेरणा मिळत असल्याचे वक्त्यांनी सांगितले. जयंतीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिराला युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेक रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी जपली. रक्तदानासारख्या उपक्रमांमुळे सामाजिक ऐक्य व मानवतेचा संदेश अधिक प्रभावीपणे पोहोचतो, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष जगदीश सुभाष राजपूत आणि उपाध्यक्ष दीपक दगडू राजपूत यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी समाजातील एकजूट, शिक्षण, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी यांचे महत्त्व अधोरेखित केले. युवकांनी महाराणा प्रताप यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन शिक्षण, समाजसेवा आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. या कार्यक्रमास समाजातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक-युवती तसेच विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमादरम्यान उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरण अनुभवायला मिळाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## शेतात बकऱ्या घुसल्याने वाद ; चौघांकडून शेतकऱ्यासह मुलास मारहाण

### शहर पोलिसात गुन्हा दाखल

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा शेतशिवारातील शेतात ३० ते ४० बकऱ्या घुसल्याने पिकांची व ठिबक नळ्यांचे नुकसान झाल्यामुळे चिडलेल्या शेतकऱ्याने बकऱ्या ठेंगा सोसायटीत तक्रारीसाठी नेण्याच्या कारणावरून वाद होऊन चार जणांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसह मुलास लाकडी शिंगाड्याने बेदम मारहाण करून बंदुकीची गोळी घालून ठार मारेल, असा दम दिल्याची घटना घडली. या प्रकरणी शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



याबाबत पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहिती अशी की, चोपडा शिवारातील शेत गट क्रमांक ३९४ व ३९५ या शेतात वत्सलाबाई तुकाराम पारधी यांच्या ३० ते ४० बकऱ्या घुसल्याने शेतातील ठिबक नळ्या व पिके खाऊन जबर नुकसान केले .त्यामुळे निंमबटाईवर शेत कसणारे जोगीलाल शंकर पारधी रा. रामपुरा यांनी बकऱ्यांची तक्रार ठेंगा सोसायटी कडे देण्याचे ठरल्याने वत्सलाबाई यांचा भाचा पवन सिताराम पारधी (रा. रामपुरा) ,निलेश बापु भालेराव (पंचशील नगर), विक्की अशोक पारधी (आदर्श नगर), व मयूर यादव सोनार मल्हारपुरा या चौघांनी जोगीलाल शंकर पारधी (वय ६०) व त्यांचा मुलगा दीपक जोगीलाल पारधी (वय ३०)या दोघांना लाकडी शिंगाड्याने जबर मारहाण केली.

तसेच पवन पारधी याने दीपक यास अश्लील शिवगाळ करीत माझ्या आत्याच्या बकऱ्या धरून ठेवतोस तुला आत्ताच बंदुकीची गोळी घालून ठार मारून टाकतो अशी धमकी दिली. याप्रकरणी जोगीलाल शंकर पारधी यांच्या तक्रारीवरून चोपडा शहर पोलीस स्टेशन भाग ५ गुन्हा रजिस्टर नंबर २६३/२०२६ भारतीय न्याय दंड संहिता कलम १०९, २९६ ,,११५(२), ३५१(३)३ ५२ ,(३ )५ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक पवन कुमार देसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन चौधरी हे करीत आहेत.

## पुलाच्या कामामुळे बंद रस्ता खुला करण्याची मागणी




प्रतिनिधी । अमळनेर

**शिवशक्ती चौक ते सानेनगर या मार्गावरील नाल्यावरील पुलाचे बांधकाम सुरू असल्याने मुख्य रस्ता वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. परिणामी परिसरातील नागरिक, कामगार, विद्यार्थी तसेच वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागत आहे.**

या समस्येची दखल घेत माजी नगरसेवक मुख्तार अख्तर खाटीक यांनी विप्रो कंपनीच्या एचआर अधिकाऱ्यांची भेट घेऊन नागरिकांच्या अडचणी त्यांच्यासमोर मांडल्या. यावेळी विप्रो कंपनीसमोरील पर्यायी रस्ता तातडीने वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी करण्यात आली.

यासोबतच परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने रेल्वे बोगदा, शिवशक्ती चौक आणि सानेनगर रस्ता या महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणीही करण्यात आली. या मागण्यांबाबत विप्रो कंपनीच्या एचआर अधिकाऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून रस्ता खुला करण्याबाबत तसेच सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या प्रस्तावाबाबत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी रावसाहेब पैलवान, शालिक पाटील, प्रकाश सोनवणे आणि नानाभाऊ उपस्थित होते. नागरिकांच्या हितासाठी तसेच परिसरातील सुरक्षिततेच्या दृष्टीने या मागण्या पूर्ण व्हाव्यात, अशी अपेक्षा माजी नगरसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष मुख्तार अख्तर खाटीक यांनी व्यक्त केली.

## लासूर प्रा.आ.केंद्रात पल्स पोलिओ मोहीम पूर्व प्रशिक्षण कार्यशाळा

### जिल्हाभर २८ जूनपासून विशेष पल्स पोलिओ लसीकरण मोहीम राबवली जाणार

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील लासूर प्राथमिक आरोग्य केंद्रात विशेष पल्स पोलिओ लसीकरण मोहीम ही दि.२८ जूनपासून राबविण्यात येणार आहे. तत्पूर्वी कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षणपूर्व कार्यशाळेचे आयोजनक करण्यात आले आहे.**



लासूर येथे आयोजित कार्यशाळेला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन भायेकर, जिल्हा हिवताप अधिकार डॉ.प्रमोद सोनवणे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गिरीश गोसावी यांच्या सूचनेनुसार व वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रियंका तांबे, वैद्यकीय अधिकारी डॉ.मानसी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील, तालुका आरोग्य सहाय्यक-विजय देशमुख व तालुका हिवताप पर्यवेक्षक-जगदीश बाविस्कर यांनी उपस्थिती देऊन, उपस्थित सर्व आरोग्य कर्मचारी वर्ग, गट प्रवर्तक, आशा सेविका, अंगणवाडी सेविका यांना राज्यभर आणि आपल्या जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व सरकारी दवाखान्यात पुढील आठवड्यात होऊ घातलेले विशेष पल्स पोलिओ लसीकरण मोहीम ही दि.२८ जून २०२६ रविवार रोजी राबविण्यात येणार आहे.

**● स्टॉप डायरिया मोहीम**

**बालकांमधील कुपोषण व कुपोषणामुळे होणारे मृत्यू थांबवण्यासाठी देखील दि.१ जूनपासून स्टॉप डायरिया या नावाने विशेष मोहिम राबविली जात आहे. पोलिओ मोहिमेबाबत पूर्वी प्रशिक्षण तथा डायरिया या आजाराविषयी सखोल माहिती देऊन सम्पूर्ण शंकेचे निरसन करून, या आजाराचा उद्भव, त्याची लक्षणे व उपाययोजना बाबत मार्गदर्शन करून या मोहिमेचे महत्व पटवून दिले.**